RCS 52/2026
Exh. 1

रेग्युलर कज्जा नंबर /२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर, कागल, तालुका कागल,

यांचे कोर्टात-

१) श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ६३,
व्यवसाय: शेती व नोकरी रा. कणेरीवाडी तालुका
करविर जिल्हा कोल्हापूर.
२) श्री. तानाजी पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ६१,
व्यवसाय: शेती व नोकरी रा. कणेरीवाडी तालुका
करविर जिल्हा कोल्हापूर.
३) श्री. प्रकाश पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ५७,
व्यवसाय: शेती व नोकरी रा. कणेरीवाडी तालुका
करविर जिल्हा कोल्हापूर.
४) श्री. अजय आवबा पाटील, वय वर्षे ३०,
व्यवसाय: नोकरी रा. कणेरीवाडी तालुका
करविर जिल्हा कोल्हापूर.
५) सौ. सुप्रिया अमोल चव्हाण, वय वर्षे २८,
व्यवसाय: घरकाम रा. वंदूर तालुका कागल,
जिल्हा कोल्हापूर.

} वादी

विरुध्द

१) श्री. शिवाजी धोंडी मांडवकर, वय वर्षे ७५,
व्यवसाय: शेती रा. वाळवे खुर्द, तालुका कागल.
जिल्हा कोल्हापूर.

} प्रतिवादी

08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Order

Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues. The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.

Date : 17/04/2026 C.J.J.D.,Kagal

२) श्री. धनाजी पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ५९,
व्यवसायः शेती रा. वाळवे खुर्द, तालुका कागल.
जिल्हा कोल्हापूर.

३) श्री. प्रथमेश शिवाजी मांडवकर, वय वर्षे २८,
व्यवसायः शेती रा. वाळवे खुर्द, तालुका कागल.
जिल्हा कोल्हापूर.

४) श्री. बजरंग संभाजी मांडवकर, वय वर्षे ५९,
व्यवसायः शेती रा. वाळवे खुर्द, तालुका कागल.
जिल्हा कोल्हापूर.

५) मौजे ग्रामपंचायत वाळवे खुर्द तर्फे विद्यमान सरपंच
सौ. संगिता बाबुराव बोडके वय वर्षे सज्ञान
व्यवसायः नोकरी, व घरकाम रा. वाळवे खुर्द, तालुका
कागल, जिल्हा कोल्हापूर.

} प्रतिवादी

दावा सरसनिरस मानाने तुटक वाटणी होऊन मिळणेकरिता, हक्कज्ञापनाकरिता व कायम मनाई हुकुम होणेकरिता असलेने दावेची सर्व कारणाकरिता आकारणी रुपये ४२,८५६--०० पैसे इतके रक्कमेवर केलेली आहे.

यांतील वादींचा दावा खालीलप्रमाणे-

१) दावा मिळकतीचे वर्णन-

मौजे वाळवे खुर्द तालुका कागल, येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

अ)

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे-आर | यापैकी हिस्सा त्यांचे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| १. | ३८६ | ०-२८.२० | संपुर्ण. |

08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

| | | | |
|---|---|---|---|
| २. | ४२० | ०-३१ | ०-०८.५० |
| ३. | ४२८ | ०-२१ | ०-१० |
| ४. | ४१३ | ०-२५ | संपुर्ण |

| ब) अ.नं. | पुर्वी ग्रामपंचायत मिळकत नंबर | सध्याचा ग्रा.पं.मिळकत नंबर |
|---|---|---|
| १४६ | १०९ | १०९/१ क्षेत्र ४०० चौरस फुट |
| १४७ | १०९ | १०९/२ क्षेत्र ३३४.७७ चौरस फुट |
| ७२६ | ५८३ | क्षेत्र ३०० चौरस फुट |

यांतील अनुक्रम नंबर १४६ त्याचा ग्राम. पंचात मिळकत नंबर १०९ (१०९/१) ही मिळकत पडीक घर मिळकत असुन, ग्रामपंचात मिळकत नंबर १०९/२ व ५८३ या साध्या दगड मातीतील कौलारु घर मिळकती आहेत. त्याची बाजारभावाने किंमत रक्कम रुपये ४०,०००/- इतकी आहे.

२) दावा अर्जी कलम १, अ व ब यामध्ये वर्णन केलेल्या मिळकती वादी व प्रतिवादीच्या वाडवडिलार्जित मालकी व कब्जेवहिवाटीच्या मिळकती असुन, दावा मिळकतीमध्ये यांतील वादीं व प्रतिवादी नंबर २ यांचा निम्मा हिस्सा असुन, प्रतिवादी नंबर १ यांचा निम्मा हिस्सा आहे. सदरहू हिस्सा हा यांतील वादी व प्रतिवादी यांना यापुर्वी मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर, कागल, यांचे कोर्टातील रेग्युलर कज्जा नंबर १७/२०१० या दावेमधील निशान ५९ वर दिलेल्या आपसात तडजोड पुरसीस दिनांक १४/०६/२०१४ इसवी रोजी झालेल्या मे. कोर्टाचे हुकूमानुसार वरील हिस्सा प्राप्त झालेला आहे.

३) यांतील वादीं व प्रतिवादी नंबर १, २ यांची दावा मिळकत शेतजमीनीमध्ये व घर मिळकतीमध्ये सामाईक मालकी हक्काची कब्जेवहिवाट सुरु असुन, वादी व प्रतिवादी नंबर १ व २ यांचे दरम्यान दावा मिळकतीची आजअखेर सरसनिरस मानाने तुटक वाटणी झालेली नांही. त्याचप्रमाणे दावा मिळकतीपैकी अनुक्रम नंबर ३ वरील गट नंबर ४२८ यापैकी ४ गुंठे शेतजमीन श्री. महिपती मांडवकर यांना दिलेली आहे.

४) वर नमूद शेतजमीनी व घर मिळकती पैकी ग्रामपंचायत मिळकत नंबर १०९ हया वर नमूद दावेतील निशान ५९ वरील तडजोड पुरसीसी वादीचे वडिल पांडुरग धोंडी मांडवकर व प्रतिवादी नंबर १ श्री. शिवाजी धोंडी मांडवकर यांचे वाटणीस प्रत्येकी १/२

Ambale 08/04/2020
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

हिस्सेने वाटणीस आलेली आहे. त्या दावेचा संपुर्ण खर्च हा वादींनीच केलेला आहे.

५) वादींचे वडिल श्री. पांडुरंग धोंडी मांडवकर हे दिनांक १३/११/२०२२ इसवी रोजी वादींचे घरी वयोमानाने मयत झालेले आहेत. त्याचप्रमाणे वादींची आई सोनाबाई पांडुरग मांडवकर ही देखिल दिनांक ०७/०१/२०१५ इसवी रोजी मयत झालेली आहे. तसेच आमचे अशिलांची बहिण अनिता आवबा पाटील ही देखिल दिनांक २५/०१/२०१७ इसवी रोजी मयत झालेली आहे.

६) वर नमूद दावा मिळकतीस वारसांनोंदीने १) श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर, २) श्री. तानाजी पांडुरंग मांडवकर, ३) श्री. धनाजी पांडुरंग मांडवकर ४) श्री. प्रकाश पांडुरग मांडवकर ५) श्री. अजय आवबा पाटील, ६) सुप्रिया अमोल चव्हाण असे वारसानोंद करणेत आलेली आहे. त्या सर्व वारसांची नांवे सदरहू मिळकतीच्या ७/१२ पत्रकी सामाईकामध्ये नोंद करणेत आलेली आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर १ म्हणजे वादींचे चुलते श्री. शिवाजी धोंडी मांडवकर यांचेदेखिल नांव सामाईकरिता सदरहू मिळकतीच्या कागदोपत्री नोंद करणेत आलेले आहे.

७) वर नमूद दावा शेतजमिन व घर मिळकतीसंर्दभात वादींचे चुलते श्री. शिवाजी धोंडी मांडवकर व श्री. पांडुरंग धोंडी मांडवकर यांचे वारस वादी व प्रतिवादी नंबर २ यांचे दरम्यान आजअखेर सरसनिरिस मानाने तुटक वाटणी झालेली नांही. तसेच त्यांचे दरम्यान आजअखेर कोणताही रजिष्टर वाटणीपत्राचा दस्त नोंद करणेत आलेला नांही. सर्व मिळकती हया सामाईकमध्ये वादी व प्रतिवादी १ व २ या सर्व वारसांचे दरम्यान कष्टमशांगत करणेस आहेत. यांतील वादी हे मौजे कणेरीवाडी येथे रहात असुन, त्यांनी त्यांचे हिस्सेचे मिळकतीमध्ये कष्टमशांगत करणेकरिता कर्त्या म्हणून श्री. विनायक भोभाटे रा. वाळवे खुर्द यांस लावलेले आहे. अश्याप्रकारे दावा शेतजमीनीमध्ये यांतील वादींची शांततापुर्ण मालकी हक्काची सामाईक कब्जेवहिवाट सुरु आहे.

८) वादींचे चुलते म्हणजे प्रतिवादी नंबर १ श्री. शिवाजी धोंडी मांडवकर यांना मुलबाळ कोणीही नांही. त्यामुळे त्यांनी वर नमूद रेग्युलर कज्जा नंबर १७/२०१० या दावेचे तडजोडीचे वेळी त्यांना मुलबाळ नसलेमुळे, व त्या दावेतील तारखेस जाणेचा व दावेचा संपुर्ण खर्च हा वादींनीच केलेमुळे, श्री. पांडुरंग धोंडी मांडवकर यांची मुले म्हणजे यांतील वादी व प्रतिवादी नंबर २ यांना वर नमूद दावा मिळकतीमधील त्यांचा १/२

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kagal

हिस्सा कायमपणे मालकी हक्काने देणेचे मान्य व कबूल केलेले होते.

९) अलीकडेच यांतील वादी हे त्यांचे कर्त्या श्री. विनायक भोभाटे यांचेसोबत दावा मिळकतीमध्ये गेले असता, प्रतिवादी नंबर २ म्हणजे यांतील वादींचा लहान भाऊ श्री. धनाजी पांडुरंग मांडवकर यांनी वर नमूद दावा शेतजमीनीमध्ये तुम्ही येणेचे नांही, ती शेतजमीन माझ्या मुलाचे नांवे दत्तक घेतलेली आहे. असे बोलून वादी नंबर १ श्री. आनंदा पाडुरंग मांडवकर यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. त्याबाबत यांतील वादींनी अधिक चौकशी केली असता, प्रतिवादी नंबर १ व २ यांनी संगनमताने जाणिवपुर्वक वादींचा दावा मिळकतीमधील हिस्सा डावलणेचे हेतूने प्रतिवादी नंबर १. श्री. शिवाजी धोंडी मांडवकर यांनी प्रतिवादी नंबरी २ श्री. धनाजी पांडुरंग मांडवकर यांचा मुलगा प्रतिवादी नंबर ३ कुमार प्रथमेश यास दत्तक घेतलेले आहे. त्यासंदर्भात कागल येथील मे. दुय्यम निंबधक कार्यालयामध्ये रजिष्टर दत्तकपत्र दस्त नंबर १७६४ दिनांक ०२/०९/२०२१ इसवी रोजी नोंदविलेचे अलीकडेच यांतील वादींना समजुन आलेले आहे. तो दस्त नोंदवितांना कोणताही दत्तक विधी करणेत आलेला नव्हता वनांही. तसेच दत्तकविधीतील कायदेशिर बाबी पुर्ण केलेल्या नांहीत. सदरहू दत्तकपत्राचा दस्त हा कायदेशिर नसुन पुर्णतः बोगस, बनावट व पोकळ असुन, तो रद्द होणेकामी व तसे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरिता यांतील वादींना प्रस्तुतचा दावा मे. कोर्टात दाखल करणे भाग पडत आहे.

१०) त्याचप्रमाणे वर नमूद दावा शेतजमीनीपैकी प्रतिवादी नंबर २ यांनी वाळवे खुर्द येथील अ.नं. ४ गट नंबर ४१३ यामध्ये महाराष्ट्र शासनाची फसवणुक करुन बेकायदेशिर विहिर खुदाई करणेकरिता मंजूरी घेतलेली आहे. त्यां शेतजमीनी संदर्भात अद्याप सर्व वारसांचे दरम्यान वाटप झालेले नांही. तसेच सदरहू गट नंबरमध्ये विहिर खुदाई करणेस यांतील वादींची कोणतीही समंती व मान्यता नांही. त्यामुळे यांतील वादीनी मा. गट विकास अधिकारी पंचायत समिति कागल, यांचेकडे दिनांक ०५/०३/२०२६ इसवी रोजी रितसर तक्रार अर्ज दिलेला आहे.

११) दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मालकीच्या असुन, दावा मिळकतीसंदर्भात वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान अद्याप सरसनिरस मानाने तुटक वाटणी झालेली नांही. वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दिनांक १९/०३/२०२६ इसवी रोजी दावा मिळकतीमध्ये कर्त्यासोबत कष्टमशागत करणेस गेले असता, प्रतिवादीनी

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

वादींना दावा मिळकतीमध्ये येणेचे नांही. तुमचा कोणताही हिस्सा येत नांही. असे म्हणून धमकी देवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. तसेच यांतील वादींनी प्रतिवादी नंबर १ व २ यांना दिनांक २०/०३/२०२६ इसवी रोजी रितसर कायदेशिर नोटीस पाठविणेत आलेली होती. ती नोटीस त्यांना मिळूनही प्रतिवादींनी कोणतेही उत्तर याकामी दिलेले नांही. त्यामुळे वादींना नाईलाजास्तवा प्रस्तुतचा दावा मे. कोर्टात दाखल करणे भाग पडत आहे.

१२) दावेस कारण :-

यांतील वादींनी प्रतिवादी यांचेकडे दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा दिनांक १९/०३/२०२६ इसवी रोजी तुटक करुन मागणी केला असतां, तो दिला नाही व वादींना हिस्सा देणेचे नाकारले. तसेच वादींनी प्रतिवादींना दिनांक २०/०३/२०२६ इसवी रोजी रितसर नोटीस पाठविली व ती नोटीस प्रतिवादींना मिळूनही त्यांनी कोणतेही उत्तर दिलेले नांही. त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी दावेस कारण घडत आहे.

१३) दावेची तपशिल -

| रुपये - पैसे | |
|---|---|
| ३४२--४० | वादीने दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केलेला असलेने दावा शेतजमीन मिळकतीचा एकूण आकार रुपये ०-०७ इतका असुन, वादीचे हिस्सेकरिता त्याचे ८० पट त्याची आकारणी सदरी दाखल. |
| ४०,०००-०० | दावा मिळकत पैकी १) ब) दगडमातीची दोन घरे असुन, यांची बाजारभावाने किंमत रक्कम रुपये सदरी दाखल. |
| १०००-०० | दावा मिळकतीसंदर्भात नोंदणी केलेला रजिष्टर दत्तकपत्र दस्त नंबर १७६४ दिनांक ०२/०९/२०२१ यास वादीची समंती व मान्यता न घेतलेमुळे तो दस्त वादींचे दावा मिळकतीमधील हिस्सेवर बंधनकारक नसुन पोकळ, बनावट, बोगस व बेकायदेशिर सुन तो रद् करणेत यांवा. असे हक्कज्ञापन होऊन मिळावे ही विनंती. |
| १०००-०० | वादीचा दावा कायम मनाई हुकूम होणेकरिता असलेने ठराविक आकारणी सदरी दाखल. |
| ४२,३४२--४० | ( एकूण रक्कम रुपये बेचाळीस हजार तिनशेहे बेचाळीच रुपये चाळीस पैसे फक्त ) |

Aundale 08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१४) दावेची आकारणी :-

वादीचा दावा हा वाटणी होऊन मिळणेकरिता असलेने, कोर्ट फि करिता व मे. कोर्टाचे अधिकाराकरिता दावेची आकारणी रुपये ४२,८५६--०० पैसे इतके रक्कमेवर केलेली असुन, त्यावर बॉम्बे कोर्ट फि ॲक्ट १९५९ मधील शेडयुल २ अर्टिकल २३ एफ अन्वये स्टॅम्प दिलेला असुन, सुट व्हॅल्यूएशन ॲक्ट १८८७ मधील कलम ९ प्रमाणे योग्य ती आकारणी ज्युरिसडिक्शनसाठी केलेली आहे.

१५) वादी, प्रतिवादी व दावा मिळकत ही मे. कोर्टाचे स्थलसिमेत असलेने, मे. कोर्टांना प्रस्तुत दावा चालविणेचा अधिकार आहे. वादींचा दावा हा मुदतीतीच्या कायदयानुसार मुदतीमध्ये आहे. तसेच यांतील वादींनी या दावेशिवाय दुस-या अन्य कोर्टात यांतील प्रतिवादीविरुध्द कोणताही दावा दाखल केलेला नांही.

१६) प्रस्तुत दावेमधील प्रतिवादी नंबर ४ व ५ यांना यादावेचे कामी फॉरमल पक्षकार केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींचेविरुध्द यांतील वादींना कोणत्याही प्रकारची दाद मागणी करणेची नांही.

१७) सबब वादींची मे. कोर्टांना विनंती कीं,

अ) वादींचा दावा हा खर्चासह मंजूर करणेत यांवा ही विनंती.

ब) दावा मिळकतीमधील १/२ हिससेपैकी वादीं नंबर १ ते ३ यांना प्रत्येकी १/५ व वादी नंबर ४ व ५ यांना १/५ इतका हिस्सा अथवा त्यांना हिंदू कायदयाप्रमाणे मे. कोर्टसाहेब ठरवितील तो हिस्सा स्वतंत्ररित्या वाटणी करुन व तुटक करुन वादींचे स्वतंत्र कब्जात देणेबाबतचा हुकूम करणेत यांवा ही विनाती. जर प्रतिवादींनी वादींचा हिस्सा तुटक करुन दिला नांही तर दावा घर मिळकतीची मे. कोर्टकमिशनर यांचेमार्फत तुटक करुन ताब्यात मिळावा ही विनंती.

क) दावा शेतजमीनीचे वाटप सी.पी.सी. कलम ५४ प्रमाणे मे. कलेक्टरसो कोल्हापूर यांचेमार्फत होऊन मिळावे ही विनंती.

ड) दावा मिळकतीसंर्दभात प्रतिवादींनी नोंदणी केलेले रजिष्टर दत्तकपत्र दस्त नंबर १७६४ दिनांक ०२/०९/२०२१ या दस्तास वादींची समंती व मान्यता न

Aundale
08/04/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

घेतलेमुळे, व कोणत्याही प्रकारचा दत्तकविधी न केलेमुळे,तसेच दावा मिळकती संर्दभात अद्याप वाटणी झालेली नसतांना तो दस्त नोंदविलेमुळे ते दत्तकपत्र हे बेकायदेशिर, बनावट, पोकळ असलेने ते रद्द होऊन मिळणेकरिता व तसे हक्कज्ञापन होऊन मिळावे ही विनंती.

इ) प्रतिवादी नंबर १, २ यांनी दावा मिळकत त्रयस्त इसमांना विक्री अथवा तबदिल करुन, गहान दान, देवू नये. तसेच दावा मिळकतीमध्ये कोणतेही नविन घराचे बांधकाम करु नये. तसेच दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करुन शासनाकडून कोणतेही अनुदान मिळवू नये, असा कायम मनाईचा हुकूम प्रतिवादीविरुध्द करणेत यांवा ही विनंती.

ई) जरुर तर दावा दुरुस्तीस मे. कोर्टाची परवानगी असावी.

उ) न्यायाचे दृष्टीने जरुर ते अन्य हुकूम याच कामी वादीचेच बाजूने करणेत यांवेत ही विनंती.

------- येणेप्रमाणे वादींचा दावा असे.

सोबत दावा, तुर्तातुर्त मनाईचा अर्ज, लिस्टसह कागदपत्रे वकिलपत्र, पत्तामेमो, दावेच्या व मनाई अर्जाच्या प्रति इत्यादी कागदपत्रे जोडलेली आहे.

कागल मे. जा. व्हावे. १) [signature]

दिनांक ०८/०४/२०२६ २) [signature]

३) [signature]

४) [signature]

५) [signature]

Drafted & Prepared by me as instructed by plaintiff [signature] (Adv. M.H. Patil)

प्रतिज्ञा

मी यांतील वादी अशी प्रतिज्ञा करते कीं, वर नमूद दावेमधील कलम १ ते १७ संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कागल सही तारीख ०८/०४/२०२६ १) [signature]

२) [signature]

३) [signature]

४) [signature]

५) [signature]

[signature] ०८/०४/२०२६
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

ॲफिडेव्हीट

मी यांतील वादी नंबर १) श्री. प्रकाश पांडुरंग मांडवकर, वय वर्षे ५७ व्यवसाय: शेती व नोकरी रा. मौजे कणेरीवाडी तालुका करविर जिल्हा कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो कीं,

वर नमूद दावेमधील व प्रतिज्ञेमधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुक्काम कागल सही तारीख- ०८/०४/२०२६

प्रतिज्ञा

मी यांतील वादी नंबर ३ अशी प्रतिज्ञा करतो कीं, वर नमूद दावेमधील व ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम कागल सही तारीख ०८/०४/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri प्रकाश पांडुरंग मांडवकर
identified by Shri ... M H Patil
whom I know personally
Dated 08/04/2026
Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.17 16:44:35 +0530